पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद-431111.

# समाजशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष : 2021-2022

विभाग प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## समाजशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल : 2021-2022

---

समाजशास्त्र विभाग शैक्षणिक वर्ष 2021 - 2022 चा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन विशेष व्याख्यान

समाजशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन दिनांक 6 डिसेंबर 2021 रोजी करण्यात आले होते. या व्याख्यानास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संजीवकुमार पांचाळ (सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) हे लाभले होते. त्यांनी **"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक सामाजिकता"** या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले होते. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की बाबासाहेबांनी केलेले कार्य कुठल्याही एका विशिष्ट जातीसमूहा पुरते मर्यादित नव्हते. समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून त्यांना न्याय व हक्क देण्यासाठी घटनेच्या माध्यमातून प्रयत्न केले.सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. आर. टकले यांनी भूषविले. सदरील व्याख्यान कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### अतिथी व्याख्यान

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 17 डिसेंबर 2021 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. रामकिशन मुंढे (समाजशास्त्र विभाग प्रमुख, एकता शिक्षण प्रसारक मंडळाचे कला महाविद्यालय बिडकीन, ता.-पैठण जि. औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी **सामाजिक परिवर्तन** या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

### भित्तीपत्रक प्रकाशन

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 17 डिसेंबर 2021 रोजी **ग्रामीण सामुदायिक आरोग्य** या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. रामकिशन मुंढे, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

### डॉ. गोविंद घुर्ये यांची जयंती

समाजशास्त्र विभागाला डॉ. गोविंद घुर्ये यांचे नाव दिलेले असल्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त दिनांक 17 डिसेंबर 2021 रोजी त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.अभिवादनास डॉ. रामकिशन मुंढे, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव आणि विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

### गटचर्चा

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 4 जानेवारी 2022 रोजी कोरोना महामारीमुळे समाजात झालेले सामाजिक परिवर्तन या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत सात विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सेमिनार**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 5 जानेवारी 2022 रोजी **समाजशास्त्राची उपयोगिता** या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये पाच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**सेमिनार**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 26 एप्रिल 2022 रोजी **धर्मनिरपेक्षता** या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सदरील सेमिनारमध्ये चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**अभ्यास सहल**

महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाची सहल औरंगाबाद तालुक्यातील लोकुत्तरा विहार, चौका येथे दिनांक 28 एप्रिल 2022 रोजी सकाळी 11 वाजता काढण्यात आली. समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना बौद्ध धर्मातील तत्त्वज्ञान, गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान यांची माहिती सांगण्यात आली. ही सहल महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग व इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आली.अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांना आर्थिक पर्यटन या संदर्भामध्ये माहिती देऊन स्थानिक बाजार पेठ कशी निर्माण होते याविषयी माहिती सांगितली. तर इतिहासच्या विद्यार्थ्यांना या ठिकाणीअसलेल्या बुद्ध मूर्ती विद्यार्थ्यांना समजून सांगण्यात आल्या तसेच धार्मिक पर्यटन या विषयावर माहिती सांगण्यात आली. सहलीमध्ये दहा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.या सहलीस अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, समाजशास्त्र विषयाच्या विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर, इतिहास विभागाचे विभाग प्रमुख विजय पांडे व डॉ. दिनेश कचकुरे उपस्थित होते.

**अतिथी व्याख्यान**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 29 एप्रिल 2022 रोजी अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. शरद सुखधने (समाजशास्त्र विभाग प्रमुख,सयाजीराव गायकवाड बाजार सावंगी, ता.-खुलताबाद जि. औरंगाबाद) हे लाभले होते. त्यांनी **ग्रामीण समाजशास्त्र** या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 29 एप्रिल 2022 रोजी **ग्रामीण व नागरी समाजशास्त्र** या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. शरद सुखधने, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. अनिल जाधव आणि विभागाचे विद्यार्थी यांच्या हस्ते झाले.

**गटचर्चा**

समाजशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक 12 मे 2022 रोजी **स्त्री विरोधी हिंसा** या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील गटचर्चेत आठ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

### समाजशास्त्र विभाग

# कार्यक्रमाची छायाचित्रे : 2021-2022





**डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनाच्या कार्यक्रमात डॉ.संजीव कुमार पांचाळ सर आपले विचार व्यक्त करताना**



अतिथी व्याख्यानात सामाजिक परिवर्तन या विषयावर डॉ. रामकिशन मुंडे सर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



ग्रामीण सामुदायिक आरोग्य या भित्ती पत्रकाचे प्रकाशन करताना






डॉ. गोविंद घुर्ये यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना

गट चर्चेमध्ये आपले मत मांडताना सागर बनसोडे हा विद्यार्थी






सेमिनार मध्ये आपले विचार व्यक्त करताना पूजा ढोके ही विद्यार्थिनी

धर्मनिरपेक्षता या विषयावर सेमिनार देताना प्राजक्ता इंगळे ही विद्यार्थिनी







लोकोत्तर महाविहार चौका येथील अभ्यास सहलीत सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक




अतिथी व्याख्यानात ग्रामीण समाजशास्त्र या विषयावर प्रा. शरद सुखधने मार्गदर्शन करताना



ग्रामीण व नागरी समाजशास्त्र या भित्ती पत्रकाचे प्रकाशन करताना



स्त्री विरोधी हिंसा या विषयावर आपले मत मांडताना शितल ढंगारे ही विद्यार्थिनी